
पुण्य नगरी
# आरोग्यजागर

| उत्तम आरोग्य | उज्ज्वल भविष्य | पुणे, मंगळवार,१४ एप्रिल २०१५


# होमिओपॅथीमुळे दुर्धर आजारावर मात






मल्टीपल स्केलेरोसिस हा मज्जातंतुवर दाहकता निर्माण करणारा आजार आहे. त्यामुळे मेंदू व मज्जारज्जुंचे कार्य बिघडते. मज्जासंस्थेतील कार्याचा बिघाडामुळे मेंदू व शरीर यांमधील संवाद बिघडतो. विविध शारीरिक, मानसिक लक्षणे आढळतात. हा आजार सातत्याने वाढणारा व परत परत उद्भवणारा आहे.

या आजाराचे कारण निश्चितपणे माहित नाही. परंतु, प्रतिकार क्षमतेमधील बिघाड किंवा मज्जातंतूवरील आवरण तयार करणाऱ्या पेशींचा बिघाड हे कारण मानले जाते. याचे कारण जनुकीय किंवा पर्यावरणातील घटक जसे की संसर्ग असे मानले जाते ( Genetics immune system ) या आजाराचे ठाम उत्तर नाही.

**आजाराची लक्षणे -**

मज्जासंस्थेच्या बिघाडामुळे स्वायत्त हालचाली बदलणे, संवेदनशीलता कमी होणे. अनैच्छिक हालचाली, तीव्र वेदना, अतिशय तीव्र (Reflexes ), मज्जापेशी अचानक आकुंचन पावणे ज्यामुळे चालता न येणे, गिळायला त्रास होणे, सतत अशक्तपणा वाटणे.

एक १८ वर्षाची सुंदर मुलगी जी मल्टीपल स्केलेरोसिसची शिकार आहे. ती दिसायला अतिशय सुंदर व प्रभावशाली होती पण चेहऱ्याने अभिमानी व अहंकारी वाटत होती. तपासणी नुसार ती शारीरिक रुपानी अशक्त व थकलेली वाटत होती. टेबलावर हाथ ठेवून ती स्वतःला आसरा देत होती. कधी भिंतीला पाठ टेकवत होती तिला चालताना त्रास होत होता तसेच लघवीच्या जागी नळी बसवली होती.

तिच्या तक्रारी याप्रमाणे -दीड महिन्यापासून दोन्ही पायांमध्ये अशक्तपणा, दिसण्यास त्रास व एखादी वस्तू नीट दाखवता येत नाही, तक्रारीची सुरुवात ताप व डोकेदुखी पासून सुरु झाली. तीन दिवसानंतर पायात अशक्तपणाचा त्रास वाढले.

इतर माहिती - चव :- मसालेदार पदार्थ, नावड :-भाज्या , स्वप्न :- जसे की मी चालायला लागले आहे व माझ्या मित्र मैत्रिणीबरोबर गप्प मारते आहे, शरीर प्रकृती : - थंड

**स्वभाव - १. लहानपणीचा स्वभाव सांगा?**

उत्तर - मी १२ वी विज्ञान शाखेतून माझे शिक्षण पूर्ण केले. इंजिनिअरिंग प्रवेश घेणार होते. मी खूप हट्टी आहे, मला एक भाऊ व एक बहीण आहे. माझा भाऊ इंजिनीयरिंग कॉलेजमध्ये आहे. चिंचवडमध्ये माझे बालपण गेले आहे. लहानपणापासून सगळे माझ्यावर प्रेम करतात कारण मी सर्वात लहान आहे.

**२. तुम्हाला राग कधी येतो?**

उत्तर - मला लगेच राग येतो, खास करुन कुणी माझ्या चुका काढल्यातर मला असे वाटते की मी जे करते ते बरोबर आहे आणि त्याच्यात जर चुका काढल्यातर मग मला राग येतो. एकदा शिक्षकांनी मला गणिताचा प्रश्न विचारला, त्यांनी तपासल्याशिवाय सांगितले की मी चुकीचे केले आहे. मला त्यांचा राग आला होता. मी माझे उत्तर दाखवले जे बरोबर होते. मला असे वाटते की, लोक मला उगिचच त्रास देतात. आमच्या परीक्षेच्या वेळे शिक्षकांनी थांबायला सांगितले कारण प्रश्न चुकीचे दिले होते. मी त्या वेळेस राग आला होता.

**३. तुम्हाला मानसिक ताण - तणाव कधी येतो ?**

उत्तर - मला ताण तणाव येत नाही. माझ्या मनासारखे नाही झाले व अपेक्षेप्रमाणे नाही घडले तर भिती वाटते किंवा माझ्या जवळचे कोणी दुखी असेल तर वाईट वाटते. दोन तीन दिवसांपूर्वी माझ्या एका मित्राला फिटचा त्रास झाला या दुर्घटनेत तो मरण पावला. तो त्या दिवशी मला भेटणार होता. माझी एक मैत्रीण सुद्धा वाईट परिस्थित आहे कारण ती आजारी असून तिची आई तिला घरातील सर्व कामे करायला सांगते.

**४. तुम्हाला स्वप्न कोणती पडतात ?**

उत्तर - मी परीक्षेमध्ये पेपर लिहीत आहे व मी पेपर अर्धाच सोडून दिला, परीक्षेला वेळेवर नाही पोहचले.

**संपूर्ण व्यक्तिमत्व**

**शरीर प्रकृती** :- थंड, अहंकारी, हट्टी (विरोधात बोललेली गोष्ट सहन होत नाही), त्रास दिल्याची भावना मित्र मैत्रिणी, आप्तेष्टांच्या जवळ राहण्याची इच्छा, दुसऱ्यांबद्दल काळजी, अन्यायाचा पक्ष नाही घेऊ शकत, बुद्धिवान, संगीताविषयी आवड, हालचाल (हळुवार आजारामुळे), मसालेदार पदार्थांची आवड

**औषधे -** कॉस्टिकम ३०- एक मात्रा.

स्पष्टीकरण - ऐवढा मोठा आजार असून त्याची काळजी वाटत नव्हती पूर्ण वेळ चेहऱ्यावर हसू नव्हते डॉक्टर आणि नातेवाईक (जे तपासणीसाठी तिला घेऊन आले होते) त्यांच्याबद्दल आदर नव्हता तिचे नातेवाईक तिला आराम करण्यासाठी मदत करत होते. त्यांच्याबद्दल तिच्या मनात उदास भावना होती, ती नाराज होती व चिडलेली होती. शिक्षकांबद्दल नाराज होती. कृतज्ञ नव्हती, बुद्धीवान होती. १२ वी मध्ये ८७% गुण मिळाले होते.

**प्रभाव -** १५ दिवसांनी तिला पुन्हा बघितले सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिची लघवीची नळी काढून टाकली होती. पायांची थरथर कमी झाली होती आणि १५ दिवसांनी पायांचे थरथरणे पूर्ण बंद झाले. तिचा आहार वाढला होता. १५ दिवसानंतर विनाआधार तिच्या पायावर उभी राहू शकत होती.

तिची स्थिती स्थिर झाली होती. तिची सर्व कामे स्वतः करत होती. मागील सात वर्षापासून असलेल्या मल्टीपल स्केलेरोसिस वरती विजय मिळवून ती आनंदी जीवन जगायला लागली.


**आदित्य होमिओपॅथिक हॉस्पिटल ॲण्ड हिलिंग सेंटर,**
**मो. ९८२२०४१८४७**


# स्वाइन फ्लूने एकाचा मृत्यू

**पुणे : प्रतिनिधी**




शहरात स्वाइन फ्लूने आणखी एकाचा बळी गेला आहे. शहरात स्वाइन फ्लूने मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या आता ८२ इतकी झाली आहे, तसेच सोमवारी स्वाइन फ्लूचे २ नवीन रुग्ण आढळून आले आहेत.

बदलत्या हवामानामुळे स्वाइन फ्लूचा आजार डोके वर काढण्याची शक्यता आहे. कडक उन्हामुळे रुग्णांची संख्या घटली आहे. मात्र सध्या ढगाळ हवामानामुळे स्वाइन फ्लूचे रुग्णांची संख्या वाढण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. सध्या महानगरपालिकेच्या व खासगी रुग्णालयांत अशा रुग्णांची तपासणी करण्यात येत आहे. १ जानेवारीपासून आजअखेर १ लाख ४६ हजार ५३८ संशयित रुग्णांची तपासणी करण्यात आली आहे. त्यातील १७ हजार ६६९ रुग्णांना टॅमी फ्लूची औषधे देण्यात आली आहेत. तर सोमवारी २ हजार ३१८ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यातील १३२ रुग्णांना टॅमी फ्लूच्या गोळ्या देण्यात आल्या, तर स्वाइन फ्लूचे दोन रुग्ण आढळले आहे. सध्या १२ रुग्णांवर जनरल वॉर्डमध्ये उपचार सुरू आहेत.

शहरात सध्या स्वाइन फ्लूचे ७९५ रुग्ण आहेत. गेल्या वर्षात ११ रुग्णांचा त्यामुळे मृत्यू झाला होता. थंडी वाजणे, अधिक ताप, सर्दी, खोकला, अंगदुखी, पोटदुखी, मळमळ, उलटी, जुलाब व पोटदुखी आदी लक्षणे दिसत असतील, तर त्यावर तातडीने उपचार घ्यावेत. तसेच तुमची प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी पौष्टिक आहार घ्यावा आणि आपल्या डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार मल्टिव्हिटॅमिनच्या गोळ्या घ्याव्यात. तसेच सार्वजनिक, गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे, बाहेर पडताना मास्कचा वापर करावा, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

ढगाळ हवामानामुळे स्वाइन फ्लूच्या रुग्णांची संख्या वाढण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. स्वाइन फ्लूच्या रुग्णावर तातडीच्या उपचारासाठी सध्या शहरातील विविध हॉस्पिटल्समधील अतिदक्षता विभागातील विशेष बेड तयार ठेवण्यात आले आहेत. तसेच स्वाइन फ्लू तपासणीबाबत महानगरपालिकेच्या नायडू हॉस्पिटलमध्ये २४ तास सेवा सुरू आहे, तसेच इतर महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये तपासणी व उपचार सुरू ठेवण्यात आले आहेत.

# सोनोग्राफी केंद्रचालकांचा बुधवारी बंद

**पुणे : प्रतिनिधी**

## गर्भलिंगनिदान विरोधी कायद्यात बदल करण्याची मागणी

गर्भलिंगनिदान विरोधी कायद्यात बदल करावेत आणि या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना सरसकट एकच शिक्षा न देता त्यांच्या गुन्ह्याच्या स्वरूपावर शिक्षा अवलंबून असावी, अशी मागणी सोनोग्राफी तंत्रज्ञ आणि डॉक्टरांनी केली आहे. त्यासाठी १५ एप्रिल रोजी एकदिवसीय लाक्षणिक काम बंद आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती इंडियन मेडिकल असोसिएशनचे राज्य अध्यक्ष डॉ. दिलीप सारडा आणि डॉ. जयंत नवरंगे यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली.

या कायद्यानुसार प्रत्येक गर्भवती स्त्रीची सोनोग्राफी करताना डॉक्टरांनी एक तीन पानी एफ नावाचा अर्ज भरून घेणे आवश्यक आहे. हा फॉर्म भरताना झालेली एखादी चूक ही प्रत्यक्ष गर्भलिंगनिदान करण्याइतकी आहे आणि त्याला त्याच स्वरूपाची शिक्षा आहे. सध्या शिक्षा झालेले ९९ टक्के डॉक्टर या अर्जातील चुकांमुळे दोषी ठरविण्यात आले आहेत, असे नवरंगे यांनी सांगितले.

त्यामुळे पुणे शहर व जिल्ह्यातील सोनोग्राफी सुविधा बंद ठेवण्याचा निर्णय सोनोग्राफी केंद्रचालकांनी घेतला आहे, असे ते म्हणाले.

# वास्तवातील सत्तासंघर्षाचा '१५ ऑगस्ट भागिले २६ जानेवारी'



'१५ ऑगस्ट भागिले २६ जानेवारी' या चित्रपटाच्या चित्रीकरणाच्या मुहूर्तप्रसंगी दीपप्रज्वलन करताना माजी मंत्री पतंगराव कदम, अभिनेता ओम पुरी, अभिनेत्री दिपाली सय्यद किशोरी शहाणे, विदर्भ भाजपचे माजी संघटनमंत्री पंडीत कुलकर्णी आदी मान्यवर.

**पुणे : प्रतिनिधी**

## पुण्यात पार पडला चित्रीकरणाचा मुहूर्त

१५ ऑगस्टला देश स्वतंत्र झाला, तसेच २६ जानेवारीला आपण संविधानाचा स्वीकार केला. मात्र अद्यापही प्रत्यक्षात लोकशाही अस्तित्वात आली नाही. लोकशाहीच्या विविध प्रश्नांवर प्रखर प्रकाशझोत टाकणाऱ्या वास्तवातील सत्तासंघर्षाचा '१५ ऑगस्ट भागिले २६ जानेवारी' या चित्रपटाच्या चित्रीकरणाचा मुहूर्त पार पडला.

पुण्यातील उत्सव हॉटेलात आयोजित करण्यात आलेल्या मुहूर्ताच्या कार्यक्रमाला चित्रपटातील विविध कलाकार उपस्थित होते. या चित्रपटात ओम पुरी, मनोज जोशी, विदर्भ भाजपचे माजी संघटनमंत्री पंडीत कुलकर्णी, असरानी, प्रेमा किरण, मेघना नायडू, दीपाली सय्यद, किशोरी शहाणे, भाऊ कदम, किशोर नांदोलस्कर, कमल अदिब, बी.के.तिवारी, के.मुथ्थुलिंगम, जयवंत वाडकर, दत्ता थोरात, शंकर मिटकरी आदी उपस्थित होते. यापैकी हिंदी चित्रपटात आपल्या अभिनयाने रसिकांच्या मनावर अधिराज्य करणाऱ्या ओम पुरी यांचे या चित्रपटाच्या माध्यमातून प्रथमच मराठी पडद्यावर आगमन होत आहे. यामुळे रसिकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

यात जनतेचा वाली कोण, कुठे आहे स्वातंत्र्य या प्रश्नांवर भाष्य करण्याचे काम हा चित्रपट करतो. योगीराज एन्टरटेन्मेंट व लहु जाधव, शंकर मिटकरी यांनी या चित्रपटाची निर्मिती केली असून, पितांबर काळे यांनी दिग्दर्शन केले आहे. पुरुषोत्तम बोरकर यांच्या कथेला आबा गायकवाड यांच्या पटकथा, संवाद व गीतांची जोड मिळाली आहे. शिवाजी काळे यांनी छायांकनाची भूमिका पार पाडली आहे. सुनिधी चौहान, तरुन्नुम मलिक यांनी गायलेल्या गीतांना वैष्णव देवा यांनी संगीत दिले आहे.






# चित्रकला प्रदर्शनास प्रतिसाद

**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यातील युवा छायाचित्रकार अंगद जोशी व त्यांच्या विद्यार्थ्यांनी काढलेल्या निवडक २०५ छायाचित्रांचे प्रदर्शन घोले रस्त्यावरील राजा रवी वर्मा आर्ट गॅलरीमध्ये नुकतेच पार पडले.

व्यक्तिचित्र, निसर्ग, वन्यजीवन, भूदृश्य आदी विषयांवरील छायाचित्रांना लोकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला.

# ज्ञानोत्सव कार्यक्रमास सुरुवात

**पुणे : प्रतिनिधी**

संतवचनांच्या संगे जीवन जगणे उन्नत करणारी वक्त्यांची भाषणे, समृद्ध साहित्य काव्यपरंपरेत भर टाकणाऱ्या पुस्तकांचे प्रकाशन, भावस्पर्शी कवितांचे सादरीकरण, संदेश संहितेवरील निरूपण, त्यास रसिक श्रोत्यांनी दिलेली उत्स्फूर्त दाद, अशा अपूर्व उत्साहात चिरंजीव पीठतर्फे आयोजित करण्यात आलेल्या द्वितीय ज्ञानउत्सवाची सुरुवात झाली.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते या ज्ञानोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. बजाज ऑटोचे महाव्यवस्थापक राजीव जोगळेकर, पंडित राजू सवार, पोपटलाल मुनोत, सरला मुनोत, पोपटलाल वरडिया आदी यावेळी उपस्थित होते. पंडित सवार यांच्या संदेशसंहिता आणि मुनोत यांच्या मनतरंगचे प्रकाशन यावेळी करण्यात आले. सवार म्हणाले, येथील लोकांनी लिहावे, त्यांचे साहित्य प्रकाशित व्हावे आणि त्यानिमित्ताने विचारवंतांचे विचार ऐकता यावेत, यासाठी ज्ञानोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

# आपलं व्यासपीठ

## संमेलनातून एकीचे बळ

पंजाबमधील घुमान या गावात ८८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन कोणत्याही वादविवादाविना पार पडले. ही मोठी समाधानकारक व मनाला आनंद देणारी घटना आहे. पंजाब सरकारने व संमेलनाचे आयोजकांनी संमेलनाची चोख व्यवस्था ठेवली होती. पंजाब आणि महाराष्ट्राचा संबंध केवळ धर्मापुरता नसून पंजाबमधील राजकारण आणि महाराष्ट्रातील राजकारण यांचेही निकटचे संबंध आहेत. संमेलनाच्या निमित्ताने मराठी व पंजाबी बांधव एकत्र आलेत. ती तशीच कायम रहावीत. स्नेह वाढत जावा.

पंजाबमधील साहित्यिकांचे संमेलन महाराष्ट्रात आल्यास मराठी-पंजाबी बांधव यांचे संबंधांना नवे रूप येईल. हे सहकार्य नामदेवापुरते मर्यादित रहणार नाही. तर विकास, शिक्षण, कृषी उद्योगाला झाला तर या संमेलनाचा हेतू साध्य झाल्याचे समाधान सर्वांनाच मिळेल.

या संमेलनाने महाराष्ट्र-पंजाबी बांधवांना एकीचे बळ दिले असून, मराठी भाषेचे दृष्टीने एक पाऊल पुढे पडले आहे.

**कृष्णा दयाराम नाईक**
**बालाजीनगर, धनकवडी, पुणे-४३**

**टीप :** आपल्या परिसरातील समस्यांबाबत आपली मते १०० ते १५० शब्दांत आपल्या छायाचित्रासह व पत्त्यासह खालील पत्त्यावर पाठवावीत.

पत्ता : दैनिक 'पुण्य नगरी' बहिरट पाटील आर्केड, दुसरा मजला, बालगंधर्व चौक, शिवाजीनगर, पुणे - ५. Email : ambika.pune@gmail.com

# यूथ Talkers

**अवकाळी पाऊस आणि गारपीट शेतकऱ्यांची पाठ सोडत नसल्याची स्थिती राज्यात आहे. सलग तिसऱ्या दिवशीही मराठवाडा, खानदेश आणि विदर्भातील काही भागांत गारपिटीसह वादळी पाऊस झाला. तसेच पावसामुळे झालेल्या दुर्घटनेमुळे अनेकांचा मृत्यू झाला आहे. प्रदूषणच याला कारणीभूत असल्याचे तरुणांचे म्हणणे आहे. याबाबत त्यांच्या या प्रतिक्रिया...**

### वातावरण बिघाडच कारणीभूत



विकास आणि बदलाच्या ओघात गेल्या काही वर्षांत वातावरणात मोठ्या प्रमाणात बदल झाले आहेत. विविध प्रकल्पांसाठी मोठमोठे कारखाने उभारण्यात येत आहेत. तसेच अशा अनेक कारणांमुळे प्रदूषण वाढत आहे. त्यामुळे सध्या होत असलेल्या गारपिटीला प्रदूषणच जबाबदार आहे. ही स्थिती आटोक्यात आणण्यासाठी कचरा जाळणे, झाडे तोडण्यासारख्या प्रकारांना आळा घातला पाहिजे. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राबविलेल्या स्वच्छ भारत अभियानाला गती देणे गरजेचे आहे. त्यामुळे अशा नैसर्गिक संकटात घट होऊ शकेल.

**प्रांजल जांभोरकर**

### शेतकऱ्यांनीही रोखावे प्रदूषण



प्रदूषण आणि त्यामुळे वातावरणात बदल या दोन्ही संलग्न बाबी आहेत. त्यामुळे सार्वजनिक आरोग्याबरोबर पर्यावरणात बिघाड झाला आहे. पिकांच्या फवारणीसाठी मोठ्या प्रमाणात रासायनिक खतांचा वापर केला जात आहे. तसेच घरगुती वापरातूनही मोठ्या प्रमाणात हानिकारक वायू निर्माण झाल्याचे दिसते. याचे दुष्परिणाम आज आपला शेतकरी भोगत आहे. शेतकऱ्यांनीही प्रदूषणाला आळा घालण्यासाठी काम केले पाहिजे.

**सलमान शेख**

### शेतकऱ्यांनाच सर्वांत जास्त फटका



गेल्या १५३ वर्षांत मार्च आणि एप्रिलमध्ये अशाप्रकारचा पाऊस झालेला नसल्याचे एका अहवालात सांगण्यात आले आहे. मात्र यावर्षी फारच भयानक स्थिती आहे. प्रदूषण, ग्लोबल वॉर्मिंग यामुळे शेतीचे नुकसान होत आहे. त्याचा तोटा उद्योग व्यवसायांना होत आहे.

**अक्षय गायकवाड**

या सदरांतर्गत तुम्हीही आपली मते व अनुभव मांडू शकता. तुमची मते बहिरट पाटील आर्केड, दुसरा मजला, बालगंधर्व चौक, शिवाजीनगर, पुणे-५ या पत्त्यावर किंवा ambika.pune@gmail.com या मेल आयडीवर पासपोर्ट साइज फोटोसह पाठवावीत.